Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ११] गुरुवार ते बुधवार, मार्च १८-२४, २०२१/फाल्गुन २७, शके १९४२-चैत्र ३, शके १९४३ [पृष्ठे १०, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-अ–नागपूर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४७.

**आयुक्त, महानगरपालिका, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल**

क्रमांक मनपाना-नरवि-२८७४.—

ज्याअर्थी, नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) चे कलम ३१(१) अन्वये शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस-२४९६-२६४३-प्र.क्र. ३००(अ)-९७-नवि-९, दिनांक ७ जानेवारी, २००० अन्वये भागशः मंजूर झालेली असून वगळलेल्या भागाची विकास योजना क्र.टिपीएस-२४००-१६२८-प्र.क्र. २००-२०००-नवि-९, दि. १० सप्टेंबर, २००१ नुसार अंतिमतः मंजूर करण्यात आलेली असून उक्त विकास योजना अनुक्रमे दि.१ मार्च, २००० व दि. २१ सप्टेंबर, २००१ पासून अंमलात आलेली आहे. तसेच शासन नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२४०१-८५५-प्र.क्र. ७६-नवि-९, दि. २७ फेब्रुवारी, २००२ अन्वये सात योजनाकरीता नागपूर सुधार प्रन्यासला “नियोजन प्राधिकरण” म्हणून घोषित केलेले होते. तथापि, शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२४१९-१४१९-प्र.क्र. १५४-नवि-९, दि. २७ ऑगस्ट, २०१९ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्राअंतर्गत असलेल्या ०७ योजनेकरीता सुद्धा नागपूर महानगरपालिकेला “ नियोजन प्राधिकरण ” म्हणून घोषित केलेले होते. सदर क्षेत्राकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे.

नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेतील मौजे-भांडेवाडी व पारडी येथील काही आरक्षणांचा विकास करतांना येणा-या अडचणी, विद्यमान वापर, जादाचे तद्नुषंगिक वापराकरीता आवश्यक अतिरीक्त राखीव जागा विविध प्रयोजनासाठी प्रस्तावित करणेसाठी मंजूर विकास योजनेत फेरबदल करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम-३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

प्रस्तावित फेरबदलातंर्गत मंजूर आरक्षणाचे क्षेत्र कमी करणे, आवश्यक तद्नुषंगीक विकासासाठी विविध जागा राखून ठेवणे, लगतच्या रहिवास विभागातील जागा आरक्षणातंर्गत समाविष्ट करणे, विकास योजना रस्त्याचे नियोजन करून, मंजूर आरक्षणाच्या जागेवर असणा-या विकासानुसार सदर जागा त्या त्या विभागात समाविष्ट करणेचा अंतर्भाव आहे.

नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेतील मौजा-पारडी, भांडेवाडी येथील जागा खालील प्रयोजनासाठी राखीव असून लगतच्या विभाग विकास योजनेतील रस्ते व त्याचे समुचित प्राधिकरणाबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**तपशील**

| अ. क्र. | आरक्षण क्रमांक | क्षेत्र | मौजा | खसरा क्र | समुचित प्रा. | वि.नि.प्रा. |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | E-३४ (PS) | ०.४५७६ | भांडेवाडी | ११/२ (P), ७ (P) ११/१ (P), ८० (P) | ना.सु.प्र. | मनपा |
| २ | E-३३ (M) | १.६६४० | भांडेवाडी | ८(P), ९ (P), १० (P) ११(P), १२ (P), १३ (P) | ना.सु.प्र. | मनपा |
| ३ | ME-४० (PK) | १.३७९२ | पारडी, भांडेवाडी | १३(P), ११/२ (P), ११/३ (P), ६९ | ना.सु.प्र. | मनपा |
| ४ | पुर्व-पश्चिम १८.००मी. रूंद वि.यो. रस्ता | नकाशात दर्शविल्याप्रमाणे | भांडेवाडी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे | ना.सु.प्र. | मनपा |

उपरोक्त राखीव जागेवरील विद्यमान विकास व त्या भागातील नागरीकांना मार्केट व्हेज मार्केट, फिश व मटन मार्केटची सुविधा उपलब्ध होणेच्या दृष्टीने व प्रस्तावित फेरबदलाखालील जागेवर राष्ट्रीय महामार्गामार्फत मार्केट व व्हेज मार्केटचे बांधकाम करावयाचे असल्याने जागेवरील झालेल्या विद्यमान विकासाचा विचार करता मंजूर विकास योजनेतील आरक्षणाच्या हद्दीत बदल करणे, नामाभिदानात बदल करणे तसेच १८.०० मी. रूंद रस्त्याच्या दक्षिणेकडे रहिवास विभागातील जागा मार्केट करीता राखीव ठेवणे अ.क्र. E-३४ प्राथमिक शाळेकरीता राखीव जागेवर मटन व फिश मार्केट करीता राखीव ठेवणेचे प्रस्तावित आहे. तसेच भंडारा रोडवरुन उक्त आरक्षणास सुलभ पोच रस्ता उपलब्ध होणेच्या दृष्टीने भंडारा रोडवरुन १२.०० मी. रुंद विकास योजना रस्ता व पुढे पुर्वेस १८.०० मी. रूंद विकास योजना रस्त्यास १२.०० मी. रूंद विकास योजना रस्ता प्रस्तावित करणेच्या दृष्टीने विषयांकित फेरबदल प्रस्तावित कार्यान्वित करणे आवश्यक आहे. सोबत जोडलेल्या विकास योजना भाग नकाशात दर्शविलेल्या फेरबदल प्रस्तावानुसार त्या रस्त्यालगत खालीलप्रमाणे सुधारीत विकास आराखड्यामध्ये आरक्षणाच्या क्षेत्रामध्ये झालेला बदल व पुनर्रचनेमुळे व आकारमानात झालेला बदल खालीलप्रमाणे दर्शविण्यात आलेला आहे. त्यानुसार मंजूर विकास योजनेतील आरक्षण खालील जागेच्या आकारमानात क्षेत्रफळात व स्थान मानाबाबत काही प्रमाणात फेरबदल करणे आवश्यक असून काही विकास योजनेतील आरक्षणे वगळून व काही नव्याने आरक्षणे प्रस्तावित करून भंडारा रस्त्यावरील दुकाने व भाजी विक्रेत्याकरीता नविन अत्याधुनिक मार्केटचे निर्माण करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम ३७(१) अन्वये विषयांकित फेरबदल प्रस्ताव कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

**तपशील**

| अ. क्र. | आरक्षण क्रमांक | क्षेत्र | मौजा | खसरा क्र | समुचित प्रा. | वि.नि.प्रा. |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | E-३३ (M) | ०.६५२ | भांडेवाडी | ११/१-३ (P), १२ (P) १३ (P) | मनपा | मनपा |
| २ | पार्किंग | ०.३६५६ | भांडेवाडी | १३ (P) | मनपा | मनपा |
| ३ | ग्रेव्ह-यार्ड | ०.९७ | भांडेवाडी | १३ (P) | – | मनपा |
| ४ | भंडारा रोडवरून दक्षिणे कडील १२.०० मी. रुंद विकास योजना रस्ता | ०.१५४ | भांडेवाडी | ११/१-३ (P), | मनपा | मनपा |
| ५ | रहिवास | नकाशात दर्शविल्याप्रमाणे ०.१२२ | भांडेवाडी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे | – | मनपा |
| ६ | ME-४० Vegitable Market | ०.९० | भांडेवाडी पारडी | ११/१-३ (P), १३ (P) ६ (P), ७ (P) ,८१ (P) | मनपा | मनपा |
| ७ | १२.०० मी रूंद विकास योजना रस्ता | ०.१९९२ | भांडेवाडी | ११/१-३ (P), १२ (P) १३ (P) | मनपा | मनपा |

**तपशील**-चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | E-३४ (PS) Mutton & Fish Market | ०.६३४ | भांडेवाडी | ६ (P), ७ (P) | मनपा | मनपा |
| ९ | Market & Parking | ०.८९ | पारडी | ६९ (P) | मनपा | मनपा |

ज्याअर्थी नागपूर शहराच्या मंजूर विकास आराखड्यामध्ये मौजा-भांडेवाडी येथील ME-३३ (M)मार्केटकरीता आरक्षित क्षेत्र १.६६४ हेक्टर मध्ये बदल करून मार्केटकरीता ०.६५२ हेक्टर करणे, वाहनतळ व उर्वरीत इशान्येकडील जागेत विद्यमान Grave Yard करीता ०.९७ हेक्टर जागा दर्शविणे व उर्वरीत क्षेत्र प्रस्तावित १२.०० मी. रूंद विकास योजना रस्त्यामध्ये समाविष्ट करणे तसेच ME-४० मंजूर विकास आराखड्यामधील पार्ककरीता आरक्षित क्षेत्र १.३७२ हेक्टर रद्द करून त्याच्या नामाभिदानात बदल करून भाजी मार्केटकरीता व वाहनतळाकरीता प्रस्तावित क्षेत्र ०.९० हेक्टर व राखीव ठेवणे. तसेच मार्केटकरीता पार्किंग करीता क्षेत्र ०.२८ हेक्टर राखीव ठेवणे. तसेच भंडारा रोडवरून दक्षिणेकडे व पुढे पुर्वेस १८.०० मी. रूंद विकास योजना रस्त्यास जोडणारा १२.०० मी रूंद रस्ता प्रस्तावित विकास योजना करणे तसेच नागपूर शहराच्या मंजूर विकास आराखड्यामध्ये E-३४ (PS) यामध्ये बदल करून यामध्ये मटन व फिश मार्केट क्षेत्र ०.६३४ हेक्टर प्रस्तावित व मौजा–पारडी येथील स.न. ६९ पैकीची रहिवास विभागात समाविष्ट असलेली जागा मार्केटकरीता राखीव ठेवणेबाबत प्रस्तावित फेरबदल करण्यास्तव महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करण्याचे ठरविले आहे व यासाठी नागपूर महानगरपालिकेने ठराव क्र. ३५/वि.क्र. ११, दिनांक २०-१-२०२१ नुसार उपरोक्त फेरबदलाची कार्यवाही करण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

त्याअर्थी, उपरोक्त फेरबदल दर्शविणारा नागपूर शहराच्या सुधारीत विकास योजनेचा भाग नकाशा महानगरपालिकेच्या नगर रचना विभाग, श्री छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत, बी व सी विंग, तिसरा माळा, महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१ या कार्यालयात कामकाजाचे सर्व दिवशी कार्यालयीन कामकाजाचे वेळेत जनतेच्या निरीक्षणासाठी खुला ठेवण्यात आला आहे तरी नागरीकांना सूचित करण्यात येते की, ही सूचना प्रसिद्ध झाल्याचे तारखेपासून एक महिन्याचे कालावधीत विकास योजनेतील उपरोक्त फेरबदलाच्या संबंधात ज्या सूचना किंवा हरकती महानगरपालीकेकडे प्राप्त होतील. त्यावर महानगरपालीकेकडून सुनावाणी देण्यात येईल. तद्नंतर फेरबदलाचा प्रस्तुत प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात येईल.

नागपूर :
दिनांक ९ मार्च २०२१.

**राधाकृष्णन बी.,**
आयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४८.

BY COMMISSIONER, MUNICIPAL CORPORATION

**Modification under Section 37 of Maharashtra Regional and Town Planing Act, 1966**

No. NMC-TPD-2874.—

The Revised Development Plan of Nagpur City prepared under the provisions of Maharashtra Regional and Town Planning act, 1966 Section 31(*1*) has been partially sanctioned by the Govt *vide* Urban development Department Notification No. TPS-2496-2643-CR-300(a)-97-UD-9, dt 7th Jan 2000 and came into force from 1st March 2000. Excluded part of Development Plan has been sanctioned *vide* Government Notification No. TPS-2400-1628-CR-200-2000-UD-9, dt. 10th September 2001 and Came into force from dt. 21st September 2001. Also Nagpur Municipal Corporation has been declared as the ‘Planning Authority’ for Nagpur City except the areas covered under seven scheme *vide* Govt. Notification No. TPS-2401-855-CR-76-UD-9, dt. 27th Feb. 2002.

Whereas, at Mouza-Bhandewadi and Pardi in the Development Plan of Nagpur City. In view of consideration of problems faced due to some of Reservation and existing uses, there is a need of modification in sanctioned Development plan under Section 37(*1*) of Maharashtra Regional Town Planning Act, 1966 for essential additional reservation for various public purpose.

In proposed modification following provision are included *i.e.* minimization of reserved area provision of reservation of land for various essential development provision, inclusion of adjacent residential land in reservation, handing over the sanctioned reserved land to concerned departments as per their departmental reservations.

As per the Nagpur City Development Plan, the land in Mouza-Pardi and Bhandewadi are reserved for following provisions along with adjacent departmental development roads and their Appropriate Authorities are below.

PARTICULAR

| Sr. No. | User as per sanctioned D.P. on dt. 10/09/2001. | Area | Mouza | Kh. No. | Appropriate Authority | Development Authority |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| 1 | E-34 (PS) | 0.4576 | Bhandewadi | 11/2(P), 7(P), 11/1(P), 80(P). | NIT | NMC |
| 2 | E-33 (M) | 1.6640 | Bhandewadi | 8(P), 9(P), 10(P), 11(P), 12(P), 13(P). | NIT | NMC |
| 3 | ME-40 (PK) | 1.3792 | Pardi Bhandewadi | 13(P), 11/2(P), 11/3(P), 69 | NIT | NMC |
| 4 | East-West 18.00 mt. Wide D.P. Road | Shown in Map | Bhandewadi | Shown in Map | NIT | NMC |

The proposed development on these land and to provide facility of vegetable market, fish and mutton market for surrounding peoples, on the land under proposed modification, the construction of vegetable and non-vegetable market has to made by National Highway. In view of current development made today on these land, there is a requirement of making modification in the reserved boundary, change in nomenclature, to keep reservation of southern side of 18mt. wide road land for market to keep reservation on sanctioned reserved land of E-34 (PS) for the purpose of mutton and fish market along with that a 12.00 mt. wide D.P. road proposed from Bhandara Road to eastern 18.00 mt. wide D.P. road for easy approach road for these reservations from Bhandara Road.

The proposed modification is shown as per changes made in attached part plan of D.P. along with changes in reservation area, reconstruction, locations and shape as below.

Therefore the D.P. reservation are retain but some modification/reservation is to be required for construction of modern facilityful market and shops beside Bhandara Road. The proposed modification area shown as below.

PARTICULAR

| Sr. No. | User as per sanctioned D.P. on dt. 10/09/2001. | Area | Mouza | Kh. No. | Appropriate Authority | Development Authority |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| 1 | E-33 (M) | 0.652 | Bhandewadi | 11/1-3(P), 12(P), 13(P), | NMC | NMC |
| 2 | Parking | 0.3656 | Bhandewadi | 13(P), | NMC | NMC |
| 3 | Grave-Yard | 0.97 | Bhandewadi | 13(P), | – | NMC |
| 4 | Bhandara Road South side 12.00 mt. D.P. Road | 0.154 | Bhandewadi | 11/1-3(P), | NMC | NMC |
| 5 | Residential | Shown in Map 0 122 | Bhandewadi | Shown in Map | – | NMC |
| 6 | ME-40 Vegetable Market | 0.90 | Bhandewadi Pardi | 11/1-3(P), 13(P), 6(P), 7(P), 81(P) | NMC | NMC |

PARTICULAR—*Contd.*

| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 12.00 mt. D.P. Road | 0.1992 | Bhandewadi | 11/1-3(P), 12(P), 13(P), | NMC | NMC |
| 8 | E-34 (PS) Mutton & Fish Market | 0.634 | Bhandewadi | 6(P), 7(P), | NMC | NMC |
| 9 | Market & Parking | 0.89 | Pardi | 69(P) | NMC | NMC |

Whereas from the sanctioned development plan of Nagpur the modification in ME-33(M) 0.652 hector land for market is proposed instead of reserved 1.66 hector, to indicate 0.97 hector land for Grave Yard in reserved parking area & remaining North-East land and reaming area is to he included in proposed 12.00 mt. wide D.P. Road. From sanctioned D.P. (ME-40), the 1.372 hector area which is reserved for park is proposed to deleted and on that land 0.90 hector area for vegetable market and 0.28 hector are for parking is to be proposed.

The modification for 12.00 mt. wide D.P. Road from Bhandara Road to Extended part & up to 18.00 mt. wide D.P. is proposed.

In sanctioned D.P. E-34 (PS), the modification is proposed as 0.634 hector area for mutton & Fish market and in Mouza-Pardi, Survey No. 69 is to be proposed to converted into Market Land, the modification an to be proposed U/s 37(*1*) of the Maharahtra Regional Town Planning Act, 1966 and whereas the Nagpur Municipal Corporation General Body passed the Resolutions No. 34/Sub No. 11, Dated 21-01-2021 for the said proposed modification.

And thereafter, the part plans of Development Plan of Nagpur showing the aforesaid modification is displayed in the office of Assistant Director Town Planning Deptt. of Nagpur Municipal Corporation, Shree Chhatrapati Shivaji Maharaj Administrative Building, B & C Wing Third Floor Civil Line, Nagpur-440 001 for inspection by public during office hours on all working days. The suggestions and objections in writing which may be received by in respect of the said modifications to the Development plan within a period of 30 days from the date of publication in the *Official Gazette*, will be considered by the Municipal Corporation before submitting the said modification proposal, to the State Govt. for sanction.

Nagpur :
Dated the 9th March 2021.

RADHAKRISHNAN B.,
Commissioner,
Nagpur Municipal Corporation, Nagpur.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४९.

## मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक साप्रवि-वा.प्र.अ. २०१९-२०-नियोजन-२१२(२)-२०२१.—

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम १४२(४) व महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (वार्षिक प्रशासन अहवाल) नियम, १९६४ मधील तरतुदीनुसार मी, राहुल कर्डिले (भाप्रसे), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर याद्वारे जाहीर करतो की, चंद्रपूर जिल्हा परिषदेचा सन २०१९-२० करीताचा वार्षिक प्रशासन अहवाल जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक ५ फेब्रुवारी, २०२१ रोजी विषय क्र. २ व ठराव क्र. २ अन्वये प्रसिध्द करण्यात आला.

चंद्रपूर :
दिनांक १२ फेब्रुवारी २०२१.

**राहुल कर्डिले** (भाप्रसे),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५०.

**मुख्याधिकारी, नगर पंचायत, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(१) [कलम २१(२) सह] नुसार सिंदेवाही नगरपंचायत क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.**

क्रमांक कावि-वियो-नपंसिं-६४३-२०२१.—

शासनाने नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमयुएन-२०१४/प्र.क्र. १०१/भाग-१-नवि १८, दिनांक २५ जानेवारी २०१६ अन्वये सिंदेवाही नगर पंचायत स्थापन केलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) अन्वये सिंदेवाही नगर पंचायत क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास होण्यासाठी त्या क्षेत्राची विकास योजना तयार करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(१) [कलम २१(२) सह] अन्वये सिंदेवाही नगर पंचायतीने विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी विशेष सभेचा ठराव क्रमांक ०१, दिनांक ०४ मार्च २०२१ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(२) नुसार सिंदेवाही नगर पंचायतीच्या विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा सिंदेवाही नगर पंचायतीच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरीकांच्या याबाबत काही सूचना/हरकती असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत मुख्याधिकारी, सिंदेवाही नगर पंचायत यांचेकडे लेखी स्वरूपात द्याव्यात. विकास योजना तयार करतांना त्या सूचना/हरकतींचा योग्य तो विचार करण्यात येईल.

**डॉ. सुप्रिया बा. राठोड,**
मुख्याधिकारी,
सिंदेवाही, नगर पंचायत, सिंदेवाही.

सिंदेवाही :
दिनांक ८ मार्च २०२१.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५१.

BY CHIEF OFFICER, NAGAR PANCHAYAT

**Declaration of Intention to prepare Development Plan of Sindewahi Nagar Panchayat u/s. 23*(1)* [read with Section 21*(2)*] of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

No. WS-DP-NPS-643-2021.—

Government of Maharashtra in Urban Development Department, *vide* its Notification No. MUN-2014/C.R.101/Part-1/UD-18, dated 25th January 2016 constituted Sindewahi Nagar Panchayat. It is necessary to prepare the Development Plan for the area of Nagar Panchayat as per Section 21(*2*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for planned Development of the said area.

Hence, the Sindewahi Nagar Panchayat by its Resolution No. 01, dated 04th March 2021 has given consent to declare its intention to prepare Development Plan, as per provision of Section 23(*1*) [read with Section 21(*2*)] of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966. Accordingly, this notice is being published.

The plan showing boundary of the area included in Development Plan of Sindewahi Nagar Panchayat is kept open for inspection by the public on office working days, during office hours at the office of the Sindewahi Nagar Panchayat, as required under Section 23(*2*) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.

Any suggestion/objection of the public in this regard, may be forwarded in writing to the Chief Officer, Sindewahi Nagar Panchayat within a period of 60 (Sixty) days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette*. The suggestion/objection shall be duly considered while preparing the Development Plan.

Sindewahi :
Dated the 8th March 2021.

DR. SUPRIYA B. RATHOD,
Chief Officer,
Sindewahi, Nagar Panchayat, Sindewahi.

## पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकाला प्रसिद्ध झालेली आहे.

७

### मंगळवार, मार्च ९, २०२१/फाल्गुन १८, शके १९४२

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु) म. शा. रा., अ, क्र. १२.

### जिल्हाधिकारी, यांजकडून

**वाचा** :—(१) मा. सचिव, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र क्र. रानिआ/जिपपंस-२०१८/प्रक १२/का-७, दिनांक २६-०३-२०१९.

(२) मा. राज्य निवडणूक आयोग, यांचे पत्र क्र. रानिआ/जिपपंस-२०१९/प्रक १९/का-७, दिनांक १९-११-२०१९.

(३) मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग, यांचे पत्र क्र. रानिआ/जिपपंस-२०२१/प्रक ५/का-७, दिनांक ०५-०३-२०२१.

(४) मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग, यांचे पत्र क्र. रानिआ/जिपपंस-२०१९/प्रक १९/का-७, दिनांक २०-१२-२०१९.

(५) या कार्यालयाकडून प्रसिद्ध करण्यात आलेली दिनांक १०-०१-२०२० रोजीची अधिसूचना.

**आदेश**

क्रमांक अका-ग्रापनि-डे-१३-कावि १२३-२०२१.—

संदर्भांकित अनुक्रमांक (१) च्या पत्रान्वये नागपूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १३ पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूक २०२० साठी प्रभाग रचना व आरक्षण सोडत कार्यक्रम देण्यात आला होता. सदर कार्यक्रमासोबत प्रपत्र-१ व प्रपत्र-२ अनुक्रमे नागपूर जिल्हा परिषद व नागपूर जिल्हा परिषद अंर्तगत येणा-या १३ पंचायत समितीसाठी अनुज्ञये ठरत असलेल्या जागांचा तपशिल ठरवून देण्यात आला होता. त्याप्रमाणे नागपूर जिल्हा परिषदेसाठी अंतिम प्रभाग रचना व आरक्षण दिनांक १७ मे २०१९ रोजी प्रसिद्ध करण्यात आले होते.

तद्नंतर, संदर्भांकित अनुक्रमांक (२) च्या पत्रान्वये नागपूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणा-या १३ पंचायत समित्यांची सार्वत्रिक निवडणुकीचे मतदान दिनांक ७ जानेवारी २०२० रोजी होवून दिनांक ८ जानेवारी २०२० रोजी मतमोजणी झाली असून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ असाधारण क्रमांक-६ अन्वये या कार्यालयांचे आदेश क्रमांक जिपपंस-निवडणूक-कावि-६७-२०२०, दिनांक १० जानेवारी २०२० नागपूर जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये निवडून आलेल्या उमेदवारांची नावे प्रसिद्ध करण्यात आली होती.

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२० च्या निवडणुकीबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या रिट याचिका (सिव्हील) क्रमांक ९८०/२०१९ यासोबत संलग्न याचिका मधील दिनांक ४ मार्च २०२१ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील निवडून आलेल्या उमेदवारांची निवडणूक रद्द करणेबाबत दिलेल्या निर्देशाप्रमाणे नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरीता जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १२(२)(क) नुसार देय असलेले २७ टक्के चे आरक्षण हे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या के. कृष्णमुर्ती व इतर वि. भारत सरकार मधील आदेशानुसार कमाल ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेत ठेवून सदर जागांच्या फेर निवडणुका घेण्याचे मा. राज्य निवडणूक आयोगाला निर्देश दिले आहेत.

सदर निवडणूक प्रक्रिये दरम्यान नागपूर जिल्हा परिषद व त्या अंतर्गत येणा-या १३ पंचायत समितीच्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची निवडणूक मा. सर्वोच्च न्यायालयाचे विशेष अनुमती याचिका क्रमांक-३३९०४-३३९१० मधील ओदशाच्या अधीन राहून घेत असल्याबाबत संदर्भांकित अनुक्रमांक (२४) अन्वये सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांना कळविण्यात आले होते, तसेच त्याबाबतची व्यापक प्रसिद्धि ही दिनांक २२-१२-२०१९ रोजी प्रेस नोट स्थानिक वृत्तपत्र "महाराष्ट्र टाईम्स" मधून प्रसिद्धी करण्यात आली होती.

संदर्भांकित क्रमांक (०३) अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२० च्या निवडणुकीबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या रिट याचिका (सिव्हील) क्रमांक-९८०/२०१९ त्यासोबत संलग्न याचिका मधील दिनांक ४-०३-२०२१ रोजीच्या आदेशान्वये अंतिम निर्णय झाल्याने, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील निवडून आलेल्या उमेदवारांची निवडणूक रद्द करणेबाबत मा. राज्य निवडणूक आयोगाचे निर्देश प्राप्त झाले आहेत.

त्या अनुषंगाने नागपूर जिल्हा परिषद व त्या अंतर्गत येणा-या १३ पंचायत समितीच्या निवडणुकामध्ये अनुसूचित जाती अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यांच्या करीता आरक्षण देण्यात आलेल्या एकूण जागांची संख्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील एकूण जागांच्या ५०% पेक्षा जास्त होत असल्यास, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीस आरक्षित जागा एकूण ५०% आरक्षित जागेमधून वजा केल्यानंतर, उर्वरित जागेमधून नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाकरीता जास्तीत जास्त २७% मर्यादेत आरक्षण देय होत आहे. त्याप्रमाणे नागपूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणा-या १३ पंचायत समितीमध्ये ५०% मर्यादे बाहेर आरक्षित झालेल्या जागांची आणि सर्वोच्च न्यायालयांच्या आदेशानुसार देय असलेल्या नागरिकांचा मागास प्रवर्गाच्या जागांच्या तपशिल मा. आयोगाचा दिनांक ५-०३-२०२१ च्या पत्रासोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये दिला आहे.

त्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयांच्या निर्णयाप्रमाणे व मा. राज्य निवडणूक आयोग यांचे दिनांक ५-०३-२०२१ रोजीच्या आदेशात दिलेल्या निर्देशाप्रमाणे नागपूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणा-या १३ पंचायतीसाठी मा. राज्य निवडणूक आयोगाचे दिनांक १९-११-२०१९ निवडणुका कार्यक्रमाप्रमाणे निवडणुका होवून संदर्भांकित अनुक्रमांक (५) मधील अधिसूचनेत नमूद नागरिकांचा मागास प्रवर्गातून निवडून आलेले खालील नमूद परिशिष्ट-१ मध्ये १६ जिल्हा परिषदेच्या सदस्यांचे व परिशिष्ट-२ मध्ये १५ पंचायत समिती सदस्याचे सदस्यत्व तसेच सदस्यत्व या नात्याने धारण करीत असलेले जिल्हा परिषद व पंचायत समिती व त्याअनुषंगाने इतर प्राधिकरणावरील सदस्यांचे सदस्यत्व, मी, रविंद्र ठाकरे, जिल्हाधिकारी, नागपूर या आदेशाद्वारे दिनांक ०४-०३-२०२१ पासून पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करीत आहे.

**परिशिष्ट-१**

नागपूर जिल्हा परिषद निवडणूक २०१९-२०२० मध्ये नागरिकांचा मागास प्रवर्गामधून निवडून आलेल्या परंतु मा. सर्वोच्च न्यायालयांच्या रिट याचिका ९८०/२०१९ त्यासोबत संलग्न याचिका मधील दिनांक ४-३-२०२१ रोजीच्या आदेशान्वये व मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे संदर्भांकित क्रमांक (३) च्या आदेशान्वये सदस्य पद रद्द करण्यात आलेल्या सदस्यांची नावे.

| अ. क्र. | तालुका | जिल्हा परिषद निवडणूक विभागाचे नाव | आरक्षण | निवडून आलेल्या सदस्यांचे नाव | कायमचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | नरखेड | २-सावरगांव . . . . | ना.मा.प्र. (महिला) | बोडखे देवका पुरुषोत्तम | रा. सावरगाव, तालुका नरखेड, जिल्हा नागपूर. |
| २ | नरखेड | ४-भिष्णूर . . . . | ना.मा.प्र. (महिला) | जोध पुनम प्रविणराव | रा. मु. पो. लोहारी सांवगा, तालुका नरखेड, जिल्हा नागपूर. |
| ३ | काटोल | ५-येनवा . . . . | ना.मा.प्र. | उमप समिर शंकरराव | रा. येनवा, तहसिल काटोल, जिल्हा नागपूर. |
| ४ | काटोल | ६-पारडसिंगा . . . . | ना.मा.प्र. | कोल्हे चंद्रशेखर लक्ष्मणराव | रा. मु. पो. वाई खुर्द, तालुका काटोल, जिल्हा नागपूर. |
| ५ | सावनेर | १३-वाकोडी . . . . | ना.मा.प्र. (महिला) | शिरसकर ज्योती अनिल | रा. कॉर्टर नं. १३/४, बजाज कॉलोनी डब्लुसीएल वाघोडा, तह. सावनेर जिल्हा नागपूर. |
| ६ | सावनेर | १४-केळवद . . . . | ना.मा.प्र. | कुंभारे मनोहर शंकरराव | रा. नांदीखेडा, पो. तेलगांव ता. कळमेश्वर जिल्हा नागपूर. |
| ७ | पारशिवनी | १९-करभांड . . . . | ना.मा.प्र. (महिला) | भोयर अर्चना दिपक | रा. पारडी, तह. पारशिवनी, जिल्हा नागपूर. |
| ८ | रामटेक | २३-बोथिया (पालोरा) . . | ना.मा.प्र. | राउत कैलाश यशवंत | रा. नवेगाव चिचदा, पो. मुसेवाडी, तह. रामटेक, जिल्हा नागपूर. |

**परिशिष्ट-१**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ९ | मौदा | २७-अरोली . . . . | ना.मा.प्र. | देशमुख योगेश नागोराव | रा. मु. पो. आरोली, ता. मौदा, जिल्हा नागपूर. |
| १० | कामठी | ३४-गुमथळा . . . . | ना.मा.प्र. | निधान अनिल रामभाऊ | रा. आसोली, पो.दिघोरी, तह. कामठी, जिल्हा नागपूर. |
| ११ | कामठी | ३५-वडोदा . . . . | ना.मा.प्र. (महिला) | लेकूरवाळे अवंतिका रमेश | रा. घर क्र. ७५, तरोडी (बु.), तह. कामठी, जिल्हा नागपूर. |
| १२ | नागपूर (ग्रामिण) | ३६-गोधनी (रेल्वे) . . | ना.मा.प्र. (महिला) | राउत ज्योती दिपक | रा. प्लॉट नं. ४२, बसस्टॉप जवळ, गोधनी रेल्वे, तह. नागपूर (ग्रामिण), जिल्हा नागपूर. |
| १३ | हिंगणा | ४३-निलडोह . . | ना.मा.प्र. | हरडे राजेंद्र विठ्ठल | रा. पोलीसनगर, हिंगणा रोड, डिगडोह देवी, ता. हिंगणा, जिल्हा नागपूर. |
| १४ | हिंगणा | ४४-डिगडोह . . | ना.मा.प्र. (महिला) | ठाकरे सुचिता विनोद | रा. घर क्रमांक १८२४, पोलीसनगर, डिगडोह देवी, ता. हिंगणा, जिल्हा नागपूर. |
| १५ | हिंगणा | ४५-डिगडोह इसासनी . . | ना.मा.प्र. (महिला) | गिरी अर्चना कैलाश | रा. प्लॉट नं. ०५, हिंगणा रोड, कालमेघ नगर, जिल्हा नागपूर. |
| १६ | कुही | ५३-राजोला . . . . | ना.मा.प्र. | ठवकर भोजराज हनुमान | रा. मु. लोहार, पो. अडम, ता. कुही, जिल्हा नागपूर. |

**परिशिष्ट-२**

नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत येणा-या १३ पंचायत समितीच्या सन २०१९-२०२० निवडणूकीमध्ये मध्ये नागरिकांचा मागास प्रवर्गामधून निवडून आलेल्या परंतु मा. सर्वोच्च न्यायालयांच्या रिट याचिक ९८०/२०१९ त्यासोबत संलग्न याचिका मधील दिनांक ४-३-२०२१ रोजीच्या आदेशान्वये सदस्य पद रद्द करण्यात आलेल्या सदस्यांची नावे.

| अ. क्र. | तालुका | पंचायत समिती गणांचे नाव | आरक्षण | निवडून आलेल्या सदस्यांचे नाव | कायमचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | कळमेश्वर | १७-तेलकामठी . . . . | ना.मा.प्र. (महिला) | वसु मालती धनराज | रा. तेलकामठी, तह. कळमेश्वर, जिल्हा नागपूर. |
| २ | कळमेश्वर | १८-कोहळी . . . . | ना.मा.प्र. | भिंगारे श्रावण महिपतरावजी | रा. सुसूंद्री, पो. कोहळी, तह. कळमेश्वर, जिल्हा नागपूर. |
| ३ | सावनेर | २३-बडेगांव . . . . | ना.मा.प्र. (महिला) | चिखले भावना अरुण | रा. मु. पो. बडेगाव, तहसिल सावनेर, जिल्हा नागपूर. |
| ४ | सावनेर | २६-वाघोडा . . . . | ना.मा.प्र. (महिला) | केसरे ममता प्रशांत | रा. वार्ड क्रं. ०३, खानगाव, तहसिल सावनेर, जिल्हा नागपूर. |
| ५ | सावनेर | २८-नांदागोमुख . . . . | ना.मा.प्र. | ठाकरे गोविंदा बारकू | रा. वार्ड क्र. ०२, उमरी (भ), तहसिल सावनेर, जिल्हा नागपूर. |

**परिशिष्ट-२**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ६ | रामटेक | ४६-उमरी . . . . | ना.मा.प्र. (महिला) | कुंभलकर भुमेश्वरी विश्वनाथ | रा. पो. हिवराबाजार, ता.रामटेक जिल्हा नागपूर. |
| ७ | रामटेक | ४९-मनसर . . . . | ना.मा.प्र. (महिला) | ठाकरे कला उमेश | रा. पो. मनसर, तह.रामटेक, जिल्हा नागपूर. |
| ८ | रामटेक | ५१-नगरधन . . . . | ना.मा.प्र. | होलगीरे भुषण गजानन | रा. पो. नगरधन, तह.रामटेक, जिल्हा नागपूर. |
| ९ | हिंगणा | ८५-निलडोह वडधामना . . | ना.मा.प्र (महिला) | आंबटकर बबीता राहुल | रा. पो. वडधामना, वार्ड क्रमांक ०४, ता. हिंगणा, जिल्हा नागपूर. |
| १० | हिंगणा | ८७-डिगडोह-१ . . | ना.मा.प्र | काळबांडे सुरेश सुखदेवराव | रा.माउली ॲपार्टमेंट, बालाजी नगर, हिंगणा रोड, जिल्हा नागपूर. |
| ११ | हिंगणा | ८९-डिगडोह इसासनी | ना.मा.प्र | अव्हाळे बबनराव अवधुतराव | रा.प्लॉट ४९, लोकमान्य नगर, वार्ड क्रमांक ६, निलडोह, जिल्हा नागपूर. |
| १२ | हिंगणा | ९३-नेरी मानकर . . | ना.मा.प्र (महिला) | ठाकरे अंकिता रविंद्र | रा. नेरी मानकर, पो. व्याहाळपेठ, ता. हिंगणा, जिल्हा नागपूर. |
| १३ | उमरेड | ९८-मकरधोकडा . . | ना.मा.प्र (महिला) | गिल्लूरकर शालू धनराज | रा. वार्ड क्रं. ०३, मु. पो. मकरधोकडा, तह. उमरेड, जिल्हा नागपूर. |
| १४ | उमरेड | १०१-देवळी . . | ना.मा.प्र | लेंडे सुरेश दयाराम | रा. मु. पो. मकरधोकडा, तह. उमरेड, जिल्हा नागपूर. |
| १५ | भिवापूर | ११६-नांद . . | ना.मा.प्र (महिला) | नारनवरे नंदाबाई दयाराम | रा. मु. पो. नांद, तह. भिवापूर जिल्हा नागपूर. |

**रविंद्र ठाकरे,**

जिल्हाधिकारी,
नागपूर.

नागपूर :
दिनांक ८ मार्च २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.